





# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा




रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, बुधवार दि. ३०.०९.२०२६ | अंक नं. १५४ | वर्ष ६९ वे | दैनिक वर्ष ६३ वे | ANR/022/2018-2020




## प्रस्थापितांच्या 'बिनविरोध'च्या मनसुब्यांना सभासदांकडून धक्का : प्रा.राम शिंदेंचा दावा

### सर्वांना विश्वासात घेतल्याशिवाय निर्णय कसा?

नगर - अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेची निवडणूक बिनविरोध करण्याची चर्चा सुरु असली तरी संबंधित सर्व प्रमुख नेत्यांच्या बोलण्यामध्ये एकसूत्रता राहिलेली नसल्याचे चित्र दिसत आहे. त्यामुळे उमेदवारी अर्जांसाठीची गर्दी पाहता सभासदांनी स्वतःहून फॉर्म घेण्यास सुरुवात केली असल्याचे दिसते आहे. त्यातून प्रस्थापितांच्या मनसुब्यांना धक्का बसला आहे, असा दावा विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी केला. सभासदांनी मोठ्या प्रमाणात उमेदवारी अर्ज घेतलेले आहेत. ५४१ फॉर्म आत्तापर्यंत सभासदांनी घेतलेले आहेत. यावरुन निवडणूक बिनविरोध होणार की नाही, हे स्पष्ट होतं, असे सूचक भाष्यही त्यांनी केले.


जिल्हा बँकेच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज घेताना विधानपरिषद सभापती प्रा. राम शिंदे.

संचालक मंडळाच्या २१ जागांसाठीची निवडणूक प्रक्रिया सध्या सुरु आहे. ही निवडणूक लढवण्याचे प्रा. राम शिंदे यांनी मागेच जाहीर केले होते व त्याअनुषंगाने जिल्ह्याच्या सहकार क्षेत्रातील ज्येष्ठ नेत्यांच्या भेटीगाठीही त्यांनी घेतल्या आहेत. या पार्श्वभूमीवर सभापती प्रा. शिंदे यांनी ३० सप्टेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता जिल्हा बँक निवडणुकीचा कोरा उमेदवारी अर्ज घेतला. यासाठी ते जिल्हा बँकेच्या चाहुराणा-मार्केट यार्ड शाखेत आले होते. आता ते प्रत्यक्ष उमेदवारी कधी दाखल करतात याची उत्सुकता आहे.

उमेदवारीचा अर्ज घेतल्यानंतर सभापती प्रा. शिंदे यांनी माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले, अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँक आशिया खंडातील सर्वात मोठी बँक आहे. तिचे कार्यक्षेत्रही मोठे आहे. बँकेच्या ठेवीदेखील मोठ्या प्रमाणात आहेत आणि ते चांगलेच आहे. त्यामुळे सर्वसामान्य शेतकऱ्यांना पीक कर्ज वितरणही चांगले झाले आहे. बँकेची आर्थिक स्थिती चांगली आहे आणि तिचे कामही चांगले आहे. त्यामुळे ठेवीदार आणि शेतकऱ्यांचे आर्थिक संरक्षण करणे व त्यांना पाठबळ देणे हे आपले काम आहे. दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे मागणी केल्याबरोबर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने मदत करण्याची तयारी दर्शवली आहे. त्याचाही फायदा बँकेला निश्चित होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

जिल्हा सहकारी बँकेची निवडणूक लढवायची आहे. पण बिनविरोधच्या चर्चांमुळे माझ्या मनामध्ये अजून तोच प्रश्न निर्माण झाला आहे. पालकमंत्र्यांची भूमिका अजूनही स्पष्ट झालेली नाही, असे भाष्य करून सभापती प्रा. शिंदे म्हणाले, संगमनेर येथे मीटिंग झाल्यानंतर मला माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांचा फोन आला होता. माजी मंत्री शंकरराव गडाख यांचाही फोन झाला होता. आ. विवेक कोल्हे यांचाही फोन आला होता. मात्र, त्यानंतर यासंदर्भात कुठलीही चर्चा माझ्यासोबत कोणीही केलेली नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

राखीव पदांबाबत भाष्य करताना ते म्हणाले, या सर्व गोष्टींचा सारासार विचार करूनच मी फॉर्म घेतलेला आहे. त्याबाबत आणखी विचार करूनच आता तो फॉर्म भरणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## जिल्हा मध्यवर्ती बँक निवडणुकीसाठी तीन दिवसामध्ये ६८० अर्जांची विक्री

### विधानपरिषदेचे राम शिंदे, खासदार निलेश लंके यांनीही घेतला अर्ज

नगर - जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीसाठी विक्रमी अर्जांची विक्री झाली असून, मागील तीन दिवसात ६८० एव्हढे अर्ज विक्री झाले असून, या सर्व अर्जांची संख्या पाहता जिल्हा बँकेच्या निवडणुकीत ३० पॅनल तयार होतील, इतके अर्ज सभासदांनी घेतले आहेत. दरम्यान विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, खासदार निलेश लंके यांनीही प्रथमच जिल्हा बँकेची निवडणूक लढविण्यासाठी उमेदवारी अर्ज घेतला असून, आपण तो अर्ज भरणार असल्याचेही त्यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

जिल्हा बँकेच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यास २८ सप्टेंबरपासून प्रारंभ झाला आहे. २८ व २९ सप्टेंबर रोजी ५३१ उमेदवारी अर्ज विक्री झाले होते. तर २९ सप्टेंबर रोजी राहुरी विकास सोसायटी मतदारसंघातून आमदार प्राजक्त तनपुरे यांनी, तर कर्जत महिला मतदारसंघातून जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा मंजुषा गुंड यांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले. २८ सप्टेंबर रोजी माजी संचालक राहूल जगताप यांनीही अर्ज दाखल केला आहे. तर ३० सप्टेंबर रोजी राम शिंदे, खासदार निलेश लंके यांनी अर्ज घेतल्याने बँकेच्या निवडणुकीसाठी दिग्गजांनी तयारी केल्याचे दिसून येत आहे.

जिल्हा बँकेच्या एकूण २१ संचालकांच्या जागेसाठी ही निवडणूक होत असून, ३० सप्टेंबर रोजी दुपारपर्यंत ६८० अर्जांची विक्री झाली होती. या अर्जांमधून बँकेच्या निवडणुकीसाठी तब्बल ३० पॅनल तयार होतील, अशी स्थिती समोर आली आहे. त्यामुळे जिल्हा बँकेच्या बिनविरोधच्या चर्चांना खो बसतो की काय, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

### ९ जणांनी केले अर्ज दाखल

जिल्हा बँक निवडणुकीसाठी इच्छुकांनी मोठ्या संख्येने अर्ज घेतले असून, मागील तीन दिवसात ९ अर्ज दाखल झालेले आहेत. ३० सप्टेंबर रोजी बिगरशेती मतदारसंघातून २, इतर मागासवर्ग मतदारसंघातून २ तर महिला मतदारसंघातून १ असे एकूण ५ अर्ज दाखल झाले आहेत. याशिवाय २८ सप्टेंबर रोजी १ आणि २९ सप्टेंबर रोजी ३ अर्ज दाखल झाले होते. त्यामुळे दाखल अर्जांची संख्या ९ वर पोहोचली आहे, अशी माहिती जिल्हा उपनिबंधक कार्यालयाकडून देण्यात आली.




## विखे पाटील विरुद्ध लंके निवडणूक वाद सर्वोच्च न्यायालयात

### लंके यांना न्यायालयाची नोटीस, २० नोव्हेंबरला पुढील सुनावणी



नगर - सुजय विखे पाटील यांनी अहमदनगर लोकसभा मतदारसंघातून निलेश लंके यांच्या निवडणुकीला आव्हान देत दाखल केलेल्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने निलेश लंके यांना नोटीस काढत त्यांच्या कडून उत्तर मागितले आहे.

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीदरम्यान भ्रष्ट आचरण, निवडणुकीतील निर्धारित मर्यादेपेक्षा अधिक खर्च तसेच मतदान प्रक्रियेत अनियमितता झाल्याचा आरोप विखे पाटील यांनी केला आहे. सदर प्रकरण २४ सप्टेंबर रोजी सुनावणीसाठी मुख्य न्यायमूर्ती तसेच न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची, न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या समोर घेण्यात आले. याचिकाकर्त्यांच्या वतीने, सिनियर ॲड. नीरज किसान कौल, सिनियर ॲड. संजय खर्डे, ॲड. अनिरुद्ध देशमुख, ए.ओ.आर, ॲड. सत्यजीत खर्डे, ॲड. सनी जाधव, ॲड. अरुण लोंगानी उपस्थित होते. या आदेशानुसार सर्वोच्च न्यायालयाने प्रतिवादीस नोटीस बजावण्याचे निर्देश दिले आहेत. नोटीस २० नोव्हेंबर रोजी परत येण्यास ठेवण्यात आली आहे. मुंबई उच्च न्यायालयाने सुजय विखे पाटील यांची निवडणूक याचिका फेटाळून लावली होती. त्यानंतर त्यांनी या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे.


















जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## शहरात डुकरांना मोकाट सोडून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आणणाऱ्या इसमावर कारवाई न केल्यास आयुक्तांवर गुन्हा दाखल करण्याचा इशारा

### वारंवार तक्रारी करुनही महापालिका दखल घेत नसल्याने नागरिक त्रस्त


सिव्हिल हडको परिसरातील गणेश चौकात मोकाट सोडलेली डुकरे.

नगर – शहरातील प्रभाग क्र. ३ व ६ मधील सिव्हिल हडको, गणेश चौक, सावेडी रोड परिसरात एका व्यक्तीने ३० ते ४० डुकरे आणून सोडली आहेत. या मोकाट डुकरांमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून, रोगराई पसरण्याची भीती निर्माण झाली आहे. महापालिकेकडे याबाबत वारंवार तक्रार करुनही महापालिका दखल घेत नसल्याने तसेच संबंधितावर कारवाई करीत नसल्याने या परिसरातील नागरिकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. त्यामुळे पुढील ८ दिवसात महापालिका आयुक्तांनी संबंधितांवर कारवाई न केल्यास तसेच या मोकाट डुकरांचा बंदोबस्त न केल्यास आयुक्तांविरोधात पोलीस ठाण्यात अथवा न्यायालयात खासगी फिर्याद दाखल करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

याबाबत सूर्या फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष चंद्रकांत सूर्यभान शेळके यांनी महापालिका आयुक्तांना निवेदन दिले आहे. त्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, संबंधित परिसराचे कायमस्वरूपी रहिवासी असलेले चंद्रकांत सूर्यभान शेळके यांच्या भागात एका व्यक्तीने ३० ते ४० डुकरांना मोकाट सोडले आहे. ही डुकरे दिवस–रात्र कचरा, घाण व शौचालयाच्या परिसरात वावरत असून रस्त्यावर घाण पसरवत आहेत. यामुळे लहानांपासून ते महिलांपर्यंत सर्वांनाच नाहक त्रास होत असून परिसरात प्रचंड दुर्गंधी पसरली आहे. यातून परिसरात रोगराई वाढण्याचा धोका निर्माण झाला असून, सार्वजनिक आरोग्य धोक्यात आले आहे. हा प्रश्न केवळ घाणीचा नसून सार्वजनिक आरोग्य आणि मानवाधिकाराशी निगडित असल्याचे नमूद करत, पुढील ८ दिवसांच्या आत डुकरांच्या मालकावर कायदेशीर कारवाई करून परिसर मोकाट डुकरांपासून मुक्त करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. निर्धारित मुदतीत कारवाई न झाल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३९६, भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २७० व २७१ तसेच कलम १९८ आणि कलम १५२ नुसार जिल्हाधिकाऱ्यांकडे, राष्ट्रीय व राज्य मानवाधिकार आयोगाकडे अर्ज करून आयुक्तांविरोधात पोलीस स्टेशन व न्यायालयात खासगी फिर्याद दाखल करण्याचा इशारा शेळके यांनी दिला आहे.

### देवाचा अवतार असल्याचे सांगून कारवाईस टाळाटाळ

याबाबत माहिती देताना शेळके यांनी सांगितले की, या गंभीर समस्येबाबत यापूर्वी महापालिका कार्यालयात ४ वेळा तोंडी व लेखी तक्रारी करण्यात आल्या आहेत. मात्र, महापालिका प्रशासनाकडून यावर काहीच कार्यवाही करण्यात आलेली नाही. उलट हा वराह आहे, देवाचा अवतार आहे, असे सांगून महापालिका प्रशासनाकडून कारवाई करण्यास टाळाटाळ केली जात आहे. महापालिकेचा हा प्रकार म्हणजे नागरिकांच्या जीवाशी खेळ आणि संताप आणणारा आहे. प्राण्याला देवाचे नाव देऊन नागरिकांच्या आरोग्याशी खेळणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमननुसार चुकीचे असल्याचे शेळके यांनी म्हटले आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३९६ नुसार विनापरवाना शहरात डुकरे पाळणे आणि सोडणे हा गुन्हा आहे. असे असतानाही महापालिका जाणिवपूर्वक डुकरे सोडणाऱ्या व्यक्तीवर कारवाई करीत नसल्याचा आरोप शेळके यांनी केला आहे.

## वीज चोरी करणाऱ्यांविरुद्ध गुन्हे दाखल

नगर – नगर तालुक्यातील कामरगाव येथे महावितरणच्या पथकाने केलेल्या अचानक तपासणीदरम्यान परस्पर आकडा टाकून घरगुती वीज चोरी करत असल्याचे निदर्शनास आल्याने, वीज चोरी करणाऱ्या तिघा जणांविरोधात भारतीय विद्युत अधिनियम २००३ च्या कलम १३५ नुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

याबाबत महावितरणचे वैभव दिलीप निकम (वय ३३, रा. नवोदय कॉलनी, भूषणनगर, केडगाव, अहिल्यानगर) यांनी दोन स्वतंत्र फिर्यादी दिल्या आहेत. कामरगाव येथील पोपट काशिनाथ शेळके याच्या घरी वीज जोडणीची पाहणी केली असता, त्या ठिकाणी महावितरणची कोणतीही अधिकृत वीज जोडणी व मीटर अस्तित्वात नसताना तो बाजुच्या लघु दाब वाहिनीवरून ४ स्क्वे. एम. एम. लाल व काळ्या वायरच्या सहाय्याने आकरा टाकून स्वतःच्या फायद्यासाठी घरगुती वीज चोरी करत असल्याचे समोर आले. याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस अंमलदार दाते करत आहेत.

दुसऱ्या एका कारवाईमध्ये, याच भागातील आरोपी सोपान माणिक आंधळे आणि संतोष माणिक आंधळे (दोघे रा. कामरगाव, ता.नगर) यांनी देखील त्यांच्या घरी अधिकृत मीटर नसताना लघु दाब वाहिनीवरून आकरा टाकून बेकायदेशीरपणे घरगुती वीज चोरी केल्याचे तपासात निष्पन्न झाले. याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, स.फौ. जगदिश जंबे या गुन्ह्याचा पुढील तपास करत आहेत.

## दुचाकीवरून पडून डोक्याला मार लागल्याने दुर्दैवी मृत्यू


मधुकर नल्ला

नगर – शहरातील बालिकाश्रम रोडवरील सुडके मळा परिसरात दुचाकीवरून पडून डोक्याला गंभीर दुखापत झाल्यामुळे मृत्यू झाल्याची घटना २९ सप्टेंबर रोजी सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास घडली. मधुकर जनार्दन नल्ला (वय ५७, रा. सुडके मळा, बालिकाश्रम रोड, अहिल्यानगर) असे मृत व्यक्तीचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मधुकर नल्ला हे २९ सप्टेंबर रोजी सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास राहत्या घरासमोर दुचाकीवरून जात असताना अचानक घसरून खाली पडल्याने त्यांच्या डोक्याला गंभीर मार लागला. घटना घडल्यानंतर त्यांचा मुलगा शिवराज मधुकर नल्ला यांनी त्यांना खासगी रुग्णवाहिकेव्दारे उपचारासाठी सिव्हिल हॉस्पिटल, अहिल्यानगर येथे दाखल केले. परंतु, डॉक्टरांनी तपासणी करून त्यांना उपचारापूर्वीच मृत घोषित केले.

सिव्हिल हॉस्पिटलचे वैद्यकीय अधिकारी डॉ. चव्हाण यांनी दिलेल्या खबरीवरून तोफखाना पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मयत नल्ला यांच्या वर ३० सप्टेंबर रोजी सकाळी नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, १ मुलगा, २ भाऊ, भावजया, ३ पुतणे असा परिवार आहे.

## शहरात मोकाट कुत्र्यांचा टोळक्याने वावर; नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण



आयुक्तांना निवेदन देताना संपत बारस्कर यांच्यासह नागरिक. शेजारील छायाचित्रात टोळक्याने फिरणारे मोकाट कुत्रे. (छायाचित्र – लहू दळवी)

नगर – शहरामध्ये मोकाट कुत्र्यांचा वावर मोठ्या प्रमाणात वाढला असून, अनेक भागांमध्ये मोठ्या संख्येने कुत्र्यांचे टोळके फिरत असल्याने ज्येष्ठ नागरिक, महिला, विद्यार्थी तसेच सर्वसामान्य नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. रात्री–अपरात्री बाहेरगावाहून घरी परतणाऱ्या नागरिकांच्या अंगावर मोकाट कुत्री धावून जात असल्याने नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. यापूर्वी शहरात कुत्र्यांच्या हल्ल्यात काही बालकांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याच्या घटनाही घडल्या आहेत. मोकाट कुत्र्यांच्या प्रश्नासंदर्भात महापालिका प्रशासनाला यापूर्वी वारंवार निवेदने देण्यात आली आहेत. तसेच महासभेतही या विषयावर चर्चा करण्यात आली. मात्र, त्यानंतरही ठोस उपाययोजना झालेल्या नसल्याने शहरातील गल्लीबोळांमध्ये मोकाट कुत्र्यांचा वावर वाढतच चालला असून, नागरिकांमधील संताप अनावर होत आहे.

शहरातील मोकाट कुत्र्यांचा तातडीने बंदोबस्त करावा, या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर यांच्या नेतृत्वाखाली आयुक्त यशवंत डांगे यांच्या दालनात आंदोलन करण्यात आले. यावेळी प्रा. माणिक विधाते, नगरसेवक सुरेश बनसोडे, महेश कवले, बाळासाहेब पवार, प्रकाश भागानगरे, मयूर बांगरे, अजिंक्य बोरकर, जॉय लोखंडे, रवी दंडी, आनंद राठोड, सुरज शिंदे, गणेश बारस्कर, दीपक खेडकर, युवराज चव्हाण आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

या निवेदनात म्हटले आहे, ३ जुलै रोजी झालेल्या चर्चेनुसार पुढील आठ दिवसांत वॉर्डनिहाय नियोजन करून मोकाट व हिंसक कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याबाबत कृती आराखडा तयार करण्यात येईल, असे प्रशासनाकडून सांगण्यात आले होते. तसेच पिंपळगाव माळवी येथील निर्बीजीकरण केंद्र परिसरात मोकाट कुत्र्यांसाठी निवारा केंद्राचे काम पुढील एक महिन्यात पूर्ण करण्यात येईल, हिंसक कुत्र्यांसाठी कायमस्वरूपी बंदिस्त निवारा करण्याबाबत कार्यवाही केली जाईल, असेही आश्वासन देण्यात आले होते.

मोकाट कुत्रे पकडण्यासाठी असलेल्या पथकासोबत किंवा वाहनासोबत महापालिकेचा कायम कर्मचारी नियुक्त करून तक्रारींचा निपटारा करण्यासह कामावर देखरेख ठेवण्यात येईल, असेही प्रशासनाने सांगितले होते. आंदोलन स्थगित करून महापालिका प्रशासनाला सहकार्य करावे, अशी विनंतीही त्यावेळी करण्यात आली होती. मात्र, या आश्वासनांपैकी कोणतीही कार्यवाही अद्याप झालेली नसल्याचा आरोप बारस्कर यांनी केला. मोकाट कुत्र्यांचा वावर संपूर्ण शहरात वाढला असून, शहरातील काही भागांमध्ये नागरिकांना कुत्र्यांनी चावा घेतल्याच्या घटनाही घडल्या आहेत. वारंवार घडणाऱ्या या घटनांमुळे नागरिक भयभीत झाले असून, लोकप्रतिनिधी व नगरसेवकांकडे मोकाट कुत्र्यांबाबतच्या तक्रारी वाढत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

या मागण्यांवर तातडीने कार्यवाही न झाल्यास शहरातील नागरिकांना सोबत घेऊन कोणतीही पूर्वसूचना न देता आयुक्तांच्या दालनात तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला. या आंदोलनाची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची असेल, असेही बारस्कर यांनी नमूद केले.

### डॉ. सतीश राजुरकर यांचा पदभार काढून घ्या

मोकाट कुत्रे पकडण्याचा पदभार डॉ. सतीश राजुरकर यांच्याकडून काढून तो दुसऱ्या अधिकाऱ्याकडे देण्यात यावा. तसेच महापालिकेच्या चारही प्रभाग कार्यालयांच्या समित्यांमार्फत कुत्रे पकडण्याचे नियोजन करावे, अशी मागणी संपत बारस्कर यांनी केली. त्यावर आयुक्त यशवंत डांगे यांनी शहरातील मोकाट कुत्रे पकडण्याचा पदभार उपायुक्त मेहर लहारे यांच्याकडे देण्यात येईल आणि शहरातील मोकाट कुत्रे पकडण्याचे काम प्रभावीपणे केले जाईल, असे आश्वासन शिष्टमंडळाला दिले.

## संदीप एकाडे यांचे हृदयविकाराने निधन



नगर – बुरुडगाव रोड, एकाडे मळा येथील रहिवासी बंडूशेठ उर्फ संदीप आसाराम एकाडे (वय ५४) यांचे २९ सप्टेंबर रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, आई, भाऊ, जावई, भावजया, पुतणे, पुतण्या असा परिवार आहे. समर्थ व वैष्णवी यांचे ते वडील होत.

## विठ्ठल बत्तीन यांचे अल्प आजाराने निधन



नगर – सातभाई मळा, बत्तीन निवास येथील रहिवासी विठ्ठल गालय्या बत्तीन (वय ८०) यांचे २९ सप्टेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे २ मुले, १ मुलगी, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## अ‍ॅड. शिवाजी गोल्हार यांचे अल्प आजाराने निधन



नगर – भिस्तबाग चौक, सावेडी येथील रहिवासी अ.नगर बार असोसिएशनचे ज्येष्ठ विधीज्ञ अ‍ॅड. शिवाजी मुरलीधर गोल्हार (वय ६५) यांचे ३० सप्टेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या मागे पत्नी, ३ मुली, १ बहीण, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## अशोक खिंवसरा यांचे अल्प आजाराने निधन



नगर – सारसनगर विनायक रेसिडेन्सी येथील रहिवासी अशोक नेमीचंद खिंवसरा (भागडीकर) (वय ८०) यांचे २९ सप्टेंबर रोजी अल्प आजाराने दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. निलेश खिंवसरा, संगमनेर येथील सौ. वनीता गांधी यांचे ते वडील होत.

## उद्योजक भानुदास शिंदे यांचे निधन



आष्टी – आष्टी तालुक्यातील ठोंबळसांगवी रहिवासी व सुरत (गुजरात) येथील कापड उद्योग क्षेत्रातील प्रिटिंग मास्टर भानुदास गणपत शिंदे (वय ७३) यांचे निधन झाले. लहानपणी ते रोजगारासाठी सुरत येथे गेले होते. कापड गिरणीमधील सर्व तंत्र अवगत करून ते प्रिटिंग मास्टर झाले. त्यांनी अनेक कंपन्यामध्ये डिझाईन मास्टर म्हणून काम केले. सुरतमधील सचिन जीआयडीसीचे ते संचालक होते. त्यांच्या पार्थिवावर मूळगावी ठोंबळसांगवी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात २ मुले, मुली, सुना नातवंडे असा परिवार आहे. उद्योजक संदीप शिंदे, गणेश शिंदे यांचे ते वडील होत.

## ३ भंगार दुकानदारांवर गुन्हे दाखल; दहशतवाद विरोधी पथकाची कारवाई

### शासन आदेशाचे उल्लंघन

नगर – एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत शेंडी परिसरात दहशतवाद विरोधी शाखेकडून बजावण्यात आलेल्या नोटीस व शासनाच्या आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी तीन वेगवेगळ्या भंगार दुकानदारांवर भारतीय न्याय संहितेच्या कलम २२३ नुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. २९ सप्टेंबर रोजी ही कारवाई करण्यात आली.

नगरच्या दहशतवाद विरोधी पथकाने ९ सप्टेंबर रोजी बीएनएसएस कलम १६८ नुसार दुकानदारांना नोटीस बजावून भंगार साहित्य खरेदी–विक्री केल्याबाबतचे रजिस्टर ठेवणे आणि सीसीटीव्ही चालू ठेवणे बंधनकारक करण्यात आले होते. मात्र, तपासादरम्यान शेंडी परिसरातील मुंबई ऑटोमोबाईल भंगार दुकानदार किस्मत फजरअली खान (रा. मुकुंदनगर, अहिल्यानगर), न्यु गोसिया ऑटोमोबाईल, भंगार दुकानदार फिरोज मोहम्मद अक्रम खान (रा. मुकुंदनगर, अहिल्यानगर) आणि फैजाने ताजु शरीया ऑटोमोबाईल भंगार दुकानदार जाकीर अली फजर अली खान (रा. मुकुंदनगर, अहिल्यानगर) या तीनही दुकानदारांच्या दुकानांमध्ये तपासणी केली असता, त्यांनी भंगार खरेदी–विक्रीचे कोणतेही रजिस्टर ठेवले नसल्याचे व दुकानाचे सीसीटीव्ही कॅमेरे बंद अवस्थेत आढळले.

शासनाच्या व पोलिसांच्या आदेशाचे जाणीवपूर्वक उल्लंघन केल्यामुळे वरील तिन्ही दुकानदारांविरोधात एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले असून, पुढील तपास एमआयडीसी पोलीस करत आहेत.

## केडगावच्या लिंकरोडवर महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र हिसकावले

नगर – केडगाव परिसरातील लिंकरोड मोपेड वर चाललेल्या एका ६३ वर्षीय महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र दुचाकीस्वार चोरांनी लांबवल्याची घटना २९ सप्टेंबर रोजी सायंकाळी साडेचार वाजेच्या सुमारास घडली आहे. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सौ. संजीवनी रोहिदास भालसिंग (रा. भूषणनगर, केडगाव) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी या २९ सप्टेंबर रोजी सायंकाळी साडेचार वाजेच्या सुमारास त्यांच्या मोपेड गाडीवरून आईला भेटण्यासाठी चालल्या होत्या. त्या दरम्यान, लिंकरोडवरील अयोध्या चौकाजवळ, किर्तने हॉस्पिटलजवळ मागून आलेल्या एका दुचाकीवरील दोन अज्ञात इसमांनी त्यांच्या गाडीचा पाठलाग केला. दुचाकीवर मागे बसलेल्या चोराने चालत्या गाडीवरूनच फिर्यादी महिलेच्या गळ्यातील चार तोळे वजनाचे आणि सुमारे ७० हजार रुपये किमतीचे सोन्याचे मनीमंगळसूत्र जोमाने ओढले. त्यानंतर दोन्ही आरोपी दुचाकीवरून पसार झाले. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. याप्रकरणी अज्ञात दोघा चोरट्यांच्या विरुद्ध कोतवाली पोलीस ठाण्यात बीएनएस २०२३ च्या कलम ३०४ (य) आणि ३(५) नुसार गुन्हा नोंदवण्यात आला असून, तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक कुणाल सपकाळे करत आहेत.


मातोश्री वृद्धाश्रमातील दुहेरी खून प्रकरणातील आरोपी जेरबंद केल्यानंतर त्याच्यासमवेत एमआयडीसी पोलिस.

## विळदघाटच्या मातोश्री वृद्धाश्रमातील दुहेरी खून प्रकरणातील आरोपी जेरबंद

नगर – नगर तालुक्यातील विळदघाट येथील मातोश्री वृद्धाश्रमात राहणाऱ्या एका व्यक्तीने वृद्धाश्रमातील लोकांच्या चेष्टा–मस्करीवरून झालेल्या वादातून लोखंडी व प्लास्टिकचा दांडा असलेल्या काठीने केलेल्या बेदम मारहाणीत दोघांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली होती. या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी आरोपीला जेरबंद केले आहे.

या प्रकरणाची माहिती देताना पोलिसांनी सांगितले की, फिर्यादी दिलीप मांगीलाल चोरडिया (रा.नगर पाथर्डी रोड, भिंगार) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. २६ सप्टेंबर रोजी सकाळी ६ वाजण्याच्या सुमारास मातोश्री वृद्धाश्रम, विळदघाट येथे राहणारा आरोपी राजू तुकाराम घुले (वय ५४) याला वृद्धाश्रमातील लोक त्याची चेष्टा करतात या कारणावरून राग आला होता. याच वादातून आरोपीने वृद्धांना चालण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या, वरच्या बाजूस प्लास्टिकचा दांडा आणि खालच्या बाजूस लोखंडी भाग असलेल्या काठीने वृद्धाश्रमात राहणारे संतोष भिवराज पिरंगळ, लिंबराज दामोदर फिसके, साहेबराव दगडु भवर, बाळासाहेब आंबादास घाडगे, गोरक्ष हरीभाऊ फुंदे, गणेश छंबू घोडेके, दत्तात्रय शंकर हारके आणि मंकाळेश्वर बाबुराव हेने या आठ जणांना बेदम मारहाण करून गंभीर जखमी केले.

या मारहाणीत गंभीर जखमी झालेल्यांपैकी दत्तात्रय शंकर हारके आणि मंकाळेश्वर बाबुराव हेने यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला होता. या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम १०३(१), ११८(२), ११५(२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक हेमंत थोरात व त्यांच्या पथकाने तात्काळ कारवाई करत आरोपी राजू तुकाराम घुले यास ताब्यात घेऊन अटक केली आहे. गुन्ह्याचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक हेमंत थोरात करत आहेत.

## दादरानगर हवेली येथून आलेला बेकायदेशीर दारूचा साठा पकडला

### पोलिसांच्या कारवाईत १० लाख ८८ हजारांचा मुद्देमाल हस्तगत, चौघांवर गुन्हा दाखल



नगर – दादरा नगर हवेली येथून आणलेला बेकायदेशीर दारूचा मोठा साठा स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पकडला आहे. नेवासा तालुक्यातील सोनई पोलीस ठाण्याच्या हद्दीत करण्यात आलेल्या या कारवाईत १० लाख ८८ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या सूचनेनुसार पोलीस उपनिरीक्षक कृष्णकुमार सेदवाड व पोलीस अंमलदार विजय ठोंबरे, विकास साळवे, अमृत आढाव व बाळासाहेब गुंजाळ अशांचे पथक २९ सप्टेंबर रोजी सोनई पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलींग करत असताना, माहिती मिळाली की, प्रविण नानासाहेब धाडगे, राजेंद्र बापुराव जावळे आणि संदीप शिवाजी गायकवाड (सर्व रा. चांदा, ता. नेवासा) यांनी महाराष्ट्र राज्यात विक्रीस प्रतिबंध असलेली विदेशी दारू दादरा आणि नगर हवेली, दमण व दीव या केंद्रशासित प्रदेशातून कंटेनरने छुप्या मार्गाने आणली आहे. त्यातील काही विदेशी दारू संभाजी कचरू गायकवाड (रा. चांदा, ता. नेवासा) याच्या घरासमोर पांढऱ्या रंगाच्या मारुती ब्रिझा गाडीमधून विक्रीसाठी आणून ठेवण्यात आली आहे.

मिळालेल्या या खबरीच्या आधारे पथकाने संबंधित ठिकाणी जाऊन खात्री केली असता, तिथे मारुती सुझुकी कंपनीची ब्रिझा कार (क्र. एमएच–१२–एनयु–९१७७) आढळून आली. पंचांसमक्ष गाडीची व मालाची पाहणी केली असता, ५६,१६० रुपये किमतीच्या रॉयल स्टॅग कंपनीच्या १८० मिलीच्या ६२४ बॉटल, ३२,६४० रुपये किमतीच्या इम्पेरियल ब्लू कंपनीच्या ४८० मिलीच्या ३८४ बॉटल आणि १०,००,००० रुपये किमतीची एक ब्रिझा कार असा एकूण १०,८८,८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

जप्त केलेल्या मुद्देमालाबाबत संभाजी गायकवाड याच्याकडे अधिक चौकशी केली असता, त्याने हा साठा प्रवीण नानासाहेब धाडगे, राजेंद्र बापुराव जावळे आणि संदीप शिवाजी गायकवाड (सर्व रा. चांदा, ता. नेवासा) यांनी विक्रीसाठी आणून दिल्याची माहिती दिली. या प्रकरणी पाहिजे असलेल्या आरोपींचा शोध घेतला असता ते मिळून आले नाहीत. या सर्व आरोपींविरोधात सोनई पोलीस स्टेशन येथे महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५(अ)(ई), ८३(अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सोनई पोलीस करत आहेत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# स्व. वैशाली सरडे स्मृती लघुनाटिका स्पर्धेचा निकाल जाहीर

## ‘रसाभिनय’च्या ‘पोटात दुखतंय’ला सांघिक प्रथम क्रमांक



नगर – हौशी प्रायोगिक कलावंत संघ, अहिल्यानगर शाखेच्या वतीने आयोजित स्व. सौ. वैशाली सरडे स्मृती लघुनाटिका (स्किट) स्पर्धा २०२६ चा निकाल जाहीर करण्यात आला. स्पर्धेत विविध संघांनी सहभाग नोंदवत दर्जेदार लघुनाटिका सादर केल्या. परीक्षकांनी अभिनय, दिग्दर्शन, सादरीकरण, आशय आणि एकूण कलात्मक प्रभाव या निकषांवर परीक्षण करून विविध पारितोषिकांची निवड केली. या स्पर्धेसाठी ज्येष्ठ रंगकर्मी पी. डी. कुलकर्णी आणि डॉ.विजयकुमार जोशी यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

प्रमुख पाहुणे अभिजित दळवी यांनी उपस्थित कलाकारांना मार्गदर्शन करताना रंगभूमीवरील सातत्य, प्रयोगशीलता आणि दर्जेदार सादरीकरणाचे महत्त्व अधोरेखित केले. हौशी कलाकारांनी रंगभूमीशी सातत्याने जोडून राहून नवनवीन प्रयोग करावेत, असे आवाहन त्यांनी केले. त्यांच्या मार्गदर्शनाने उपस्थित कलाकारांना प्रेरणा मिळाली. त्यांनी विजेत्या कलाकारांचे अभिनंदन केले.

स्पर्धेच्या सांघिक पारितोषिक विभागात ‘रसाभिनय’ संस्थेच्या ‘पोटात दुखतंय’ या लघुनाट्याने प्रथम क्रमांक पटकावला. विजेत्या संघाला रु. ५,००१ रोख, सन्मानचिन्ह आणि प्रशस्तिपत्रक देण्यात आले. ‘मित्रमेळा’ संस्थेच्या ‘नट नावाचं नाटक’ या लघुनाट्याने द्वितीय क्रमांक मिळविला. त्यांना रु. ३,००१ रोख, सन्मानचिन्ह आणि प्रशस्तिपत्रक देण्यात आले. न्यू आर्ट्स कॉमर्स महाविद्यालयाच्या ‘फोक’ या लघुनाट्याने तृतीय क्रमांक पटकावला. त्यांना रु. २,००१ रोख, सन्मानचिन्ह आणि प्रशस्तिपत्रक देण्यात आले. तसेच नाट्यछटा ग्रुपच्या ‘पारू’ आणि सुपरस्टार ग्रुपच्या ‘फ्रीडम’ या लघुनाट्यांना उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले. दोन्ही संघांना रु. १,००१ रोख, सन्मानचिन्ह आणि प्रशस्तिपत्रक देण्यात आले. उत्कृष्ट दिग्दर्शन विभागात तन्मय भंडारी यांनी प्रथम क्रमांक पटकावला. त्यांना रु. ५०१ रोख, सन्मानचिन्ह आणि प्रशस्तिपत्रक देण्यात आले. अजिंक्य सोनवणे यांनी द्वितीय क्रमांक मिळविला असून त्यांना रु. ३०१ रोख, सन्मानचिन्ह आणि प्रशस्तिपत्रक, तर पृथ्वी सुपेकर यांनी तृतीय क्रमांक मिळविला असून त्यांना रु. २०१ रोख, सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्रक देण्यात आले.

उत्कृष्ट पुरुष अभिनय विभागात ओंकार बोथेकर यांनी प्रथम क्रमांक मिळविला. त्यांना रु. ५०१ रोख, सन्मानचिन्ह आणि प्रशस्तिपत्रक देण्यात आले. अजिंक्य सोनवणे यांना द्वितीय क्रमांकासाठी रु. ३०१ रोख, सन्मानचिन्ह आणि प्रशस्तिपत्रक, तर तेजस अतितकर यांना तृतीय क्रमांकासाठी रु. २०१ रोख, सन्मानचिन्ह आणि प्रशस्तिपत्रक देण्यात आले. उत्कृष्ट स्त्री अभिनय विभागात राखी गोरखा यांनी प्रथम क्रमांक पटकावला. त्यांना रु. ५०१ रोख, सन्मानचिन्ह आणि प्रशस्तिपत्रक देण्यात आले. अनुजा शिंदे यांनी द्वितीय क्रमांक मिळविला असून त्यांना रु. ३०१ रोख, सन्मानचिन्ह आणि प्रशस्तिपत्रक, तर समृद्धी कुलकर्णी यांनी तृतीय क्रमांक मिळविला असून त्यांना रु. २०१ रोख, सन्मानचिन्ह आणि प्रशस्तिपत्रक देण्यात आले. प्राप्ती अनमल आणि स्वरा सभारंजन यांना उत्तेजनार्थ पारितोषिकाने गौरविण्यात आले. त्यांना सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्रक देण्यात आले.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी अतुल सरडे, साईराज सरडे, संजय लोळगे, अविनाश कराळे, संदीप येळवंडे, तेजस अतितकर, सचिन शिंगटे यांच्यासह हौशी प्रायोगिक कलावंत संघाचे पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य, प्रायोजक तसेच विविध संघांच्या कलाकारांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन अविनाश कराळे यांनी केले. संदीप येळवंडे यांनी आभार मानले.

# प्रेरणादायी अक्षरधन

## दुसऱ्याच्या कामात लुडबूड कशाला?

"मुसाफिर" वाचनीय मननीय अक्षर धन
संकलन: दिशान फिचर्स

डॉ. मधुकर अष्टीकर लिखीत




९८९०९५६६९५

माणूस स्वतःचे काम नाही करणार धड, पण दुसऱ्याच्या कामात करील गडबड. स्वत:च्या कामात चालढकल, पण दुसऱ्याला शिकवील अक्कल. खरे तर आपण असावे आपल्या कामात दक्ष. काम मन लावून करण्यानेच यश लाभते.

आपल्या कामात झोकून द्यावे माणसाने स्वतःला मग यश लाभणारच. पण आपले कर्तव्य करताना. बुद्धीचा दुरुपयोग करू नये. मन साफ ठेवावे. मनाला भरकटू देऊ नये. धीर व धैर्य राखावे. चित्त विचलित होईल व एकाग्रता जाईल, असे रंजक व रोचक कार्यक्रम बंद ठेवावेत. परिश्रम करीत कुणी पुढे जात असेल तर त्याचा राग कशाला? तुला तोशीस न लावता प्रगतिपथावर गेला तुझा शेजारी, तर तू का मत्सराने होतोस आजारी? स्पर्धा निकोप असावी. पुढे गेलेल्याबद्दल आदरभावना राखावी. त्याने केलेल्या प्रगतीमागील त्याची तपश्चर्या ओळखावी. त्याची चिकाटी व मेहनत पारखावी. त्याने कामात वापरलेली शक्ती व युक्ती गिरवावी. अपयश आले तरी हिंमत न हारावी. दुष्टबुद्धीने दुसऱ्याच्या कामात दखल न द्यावी. उगाच दुसऱ्याच्या कामात लुडबूड करून त्याला हानी न पोहोचवावी. आपले काम करताना ही सगळे पथ्ये पाळावीत.

व्यवहारात यश लाभायचे, तर आपले भले कसे होईल, एवढे पाहायचे. हे ज्ञान नसते का माणसाला ? ते असते, पण त्याबरोबरच माझे भले होते आहे, हे माझ्या आगळ्या कर्तृत्वामुळे हा अभिमान असतो ना? मग आपल्या कर्तृत्वाचे पोवाडे गायला दुसऱ्याचे वाभाडे काढायला धजतो माणूस. माधवनाथ महाराज एका अशाच नसत्या उठाठेवी माणसाचे वर्णन करताना म्हणतात,

एक जण स्वत:चा नवा कुत्रा घेऊन चालला होता घरी तेवढ्यात त्याला दुसऱ्याचा पिसाळलेला कुत्रा रस्त्यात दिसला. स्वतःचेच दाणगट कुत्रे त्याला आवरत नव्हते. तरी तो स्वतःचे सोडून त्या दुसऱ्या कुत्र्याच्या मागे लागला. त्या कुत्र्याचा मालक भित्रा. तो म्हणाला, नसत्या भानगडी करू नकोस मित्रा. पण हा कसचा ऐकतो ? पिसाळलेला रागावतो. पिसाळलेला मग त्याच्यावरच धावतो. मग हा कावराबावरा होतो. हाड हाड करीत मागल्या पावली पळतो. गीत वाचतो, आपल्याच कामात लक्ष घालावे हे जाणतो. तसे दुसऱ्यालाही सांगतो. पण मी स्वतःच कुठे तसे वागतो? मग लाजेने चूर होतो. हे नुसते पुस्तकी ज्ञान घेऊन पढतमूर्ख ठरतो. काबाडी माणूस निकामी वस्तूंचे ओझे वाहतो. तसाच मी काबाडी बनतो. मिळवलेल्या ज्ञानाचा व्यवहारात उपयोग न करून स्वत:चा नाश ओढवतो.

– किशोर गांधी



माऊंट सिनाय कॉन्व्हेन्ट स्कूलच्या १७ वर्ष वयोगटातील मुलींचा हॉलीबॉल संघ तालुकास्तरीय स्पर्धेत विजयी होऊन जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे.

# माऊंट सिनायच्या मुलींचा हॉलीबॉल संघ तालुक्यात प्रथम

नगर – तालुक्यातील सारोळा बद्दी येथील माऊंट सिनाय कॉन्व्हेन्ट स्कूलच्या सतरा वर्ष वयोगटातील मुलींचा हॉलीबॉल संघ तालुका स्तरीय स्पर्धेत विजयी होऊन जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे. या संघात साक्षी राठोड, रूतूजा म्हस्के, निर्मयी झोडगे, सुकन्या वायकर, श्रुष्टी पोकळे, श्रुष्टी कल्हापूरे व श्रावणी म्हस्के यांचा समावेश होता. त्याचप्रमाणे आत्तापर्यंत झालेल्या विविध क्रीडा प्रकारात विद्यालयाने उल्लेखनीय कामगिरी केली.

जिल्हा स्तरीय स्पर्धेसाठी पुढील विद्यार्थ्यांची निवड झाली – प्रणव बोरूडे बुद्धिबळ, यश हिवाळे व पुर्वी कुटे तायक्वांदो, दक्ष अंकुश व निर्मयी झोडगे थाळीफेक आणि शिफा शेख थाळी फेक व गोळा फेक.

विद्यालयाच्या मुख्याध्यापिका जयश्री खरात, पर्यवेक्षिका उज्वला पंडित व सविता पाटोळे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. त्यांना क्रीडा शिक्षक किशोर उबाळे व मुजाहिद शेख यांचे मार्गदर्शन लाभले.

# अनाहत एक कलासृष्टी, नगर व ताल चक्र, पुणे यांच्यातर्फे ‘त्रिधा’ गायन वादन व नृत्याच्याविशेष मैफलीचे आयोजन

### तबला वादक पद्मश्री पं. विजय घाटे व संगीत नाटक अकादमी पुरस्कार प्राप्त पं. आनंद भाटे यांचे होणार सादरीकरण




नगर – पुनीत बालन ग्रुप प्रस्तुत अनाहत एक कलासृष्टी व ताल चक्र पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने ‘त्रिधा’ या गायन वादन व नृत्याच्या अनोख्या मैफलीचे आयोजन १ ऑक्टोबर रोजी संध्याकाळी ६.३० वाजता माऊली सभागृह, सावेडी येथे करण्यात आले आहे. कार्यक्रमाच्या पूर्वार्धात पद्मश्री पं.विजय घाटे (तबला), कथक नृत्यांगना शीतल कोलवालकर, गायक नागेश आडगावकर, हार्मोनियम वादक माधव लिमये तसेच पढन्तसाठी सागर पटोकर सहभागी होणार आहेत. या मध्ये गायन, वादन व नृत्याची जुगलबंदी अनुभवायला मिळणार आहे.

कार्यक्रमाच्या उत्तरार्धात संगीत नाटक अकादमी पुरस्कार विजेते, किराणा घराण्याचे गायक पं. आनंद भाटे यांचे गायन सादर होणार असून त्यांना तबल्यावर सागर पटोकर आणि हार्मोनियमवर माधव लिमये साथसंगत करणार आहेत.

भारतीय संगीत आणि नृत्य परंपरेचे वैभव एका व्यासपीठावर अनुभवण्याची ही दुर्मीळ संधी असून, सर्व दिग्गज कलाकारांची कला एकाच व्यासपीठावर ऐकण्याची आणि पाहण्याची संधी सर्व अहिल्यानगरकर वासियांना उपलब्ध होणार आहे. तसेच या कार्यक्रमात ज्या संगीत साधकांनी आपली संगीत साधना चालू ठेऊन १०:वी आणि १२ वी बोर्ड परीक्षेत उत्तुंग यश प्राप्त केले अश्या संगीत साधकांचा सन्मान कलाकारांच्या हस्ते होणार आहे. सदर कार्यक्रमास प्रवेश विनामूल्य असून पुढील ३ रांगा प्रमुख पाहुण्यांसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहे.

या कार्यक्रमास वेळेपूर्वी १५ मिनिटे उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन आनंद कुलकर्णी व दीप्ती करंदीकर यांनी केले आहे.

मोफत प्रवेशिकांसाठी संपर्क दीप्ती करंदीकर ९८३४३१९६०१, आनंद कुलकर्णी ७३५०३१५७१९, ओंकार देऊळगावकर ९५१८७३३९४६, अमृता बेडेकर ९६७३५५८००७, विलास बडवे ८६६८७८५६४०

# न्यू आर्ट्स महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेला राष्ट्रीय स्तरावर मानांकन

### एज्युस्किल्स कनेक्ट २०२६ मध्ये ’स्टार परफॉर्मिंग कॉलेज’ व ’इमर्जिंग टेक्नॉलॉजीज लीडरशिप’ पुरस्कारांनी सन्मान



नगर – येथील न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज (स्वायत्त) च्या शैक्षणिक गुणवत्तेची राष्ट्रीय स्तरावर दखल घेण्यात आली असून, महाविद्यालयाला दोन मानाचे राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाले असल्याची माहिती प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे यांनी दिली. जयपूर (राजस्थान) येथे झालेल्या एज्युस्किल्स कनेक्ट २०२६ या राष्ट्रीय परिषदेत हे पुरस्कार प्रदान करण्यात आले. एज्युस्किल्स आयसीओईतर्फे महाविद्यालयाला’स्टार परफॉर्मिंग कॉलेज – २०२६’ हे मानांकन मिळाले. तसेच माहिती तंत्रज्ञान व संगणकीय विज्ञानासह पारंपरिक विज्ञान व तंत्रज्ञान, मानव्यविद्या शाखांतील अभ्यासक्रम आणि महाविद्यालयीन स्तरावर तंत्रज्ञान शिक्षण पोहोचविण्यासाठी केलेल्या प्रयत्नांची दखल घेऊन ’इमर्जिंग टेक्नॉलॉजीज लीडरशिप अवॉर्ड’ देऊन महाविद्यालयाचा गौरव करण्यात आला. नॅक, बंगळुरूच्या कार्यकारी समितीचे अध्यक्ष प्रा.नागेश्वर राव आणि साउथ एशियन युनिव्हर्सिटी, दिल्लीचे कुलगुरू डॉ. के. के. अग्रवाल यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

या परिषदेसाठी महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे आणि सेंटर फॉर ॲडव्हान्स्ड स्टडीज इन अप्लाइड सायन्सेसचे प्रमुख प्रा. अरुण गांगर्डे सहभागी झाले होते. या उद्योग–शिक्षण परिषदेत देशभरातील ४०० हून अधिक विद्यापीठे व महाविद्यालये तसेच आघाडीच्या आयटी कंपन्यांतील ७०० हून अधिक मनुष्यबळ विकास (एचआर) अधिकारी सहभागी झाले होते. एज्युस्किल्स ही एआयसीटीई व यूजीसीची मान्यताप्राप्त शैक्षणिक भागीदार संस्था आहे.

एज्युस्किल्सचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. शुभंजित जगदेव व उपाध्यक्ष विवेक रंजन यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), क्लाउड कॉम्प्युटिंग, इलेक्ट्रॉनिक्स व टेलिकम्युनिकेशन या विषयांवर देश–विदेशातील तज्ज्ञांच्या सत्रांचे आयोजन केले होते. उद्योगक्षेत्रातील सद्यस्थिती, कॉर्पोरेट क्षेत्राच्या अपेक्षा आणि कॉर्पोरेट संस्कृतीवर तंत्रज्ञानाचा होणारा परिणाम याबाबत तज्ज्ञांनी शैक्षणिक संस्थांना मार्गदर्शन केले. उद्योग व शिक्षण क्षेत्रातील संवाद अधिक दृढ करण्यासाठी ही परिषद उपयुक्त ठरली. या यशाबद्दल अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे अध्यक्ष रामचंद्र दरे, उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर, सचिव ॲड. विश्वासराव आठरे पाटील, सहसचिव मुकेश मुळे, खजिनदार ॲड. दीपलक्ष्मी म्हसे पाटील, विश्वस्त व नियामक मंडळाच्या सदस्यांनी प्राचार्य, प्राध्यापक व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# जिल्हास्तरीय शालेय टेबल टेनिस स्पर्धेमध्ये कर्नल परब्स् स्कूल-अ गुरुकुलच्या खेळाडूंचे यश



जिल्हास्तरीय शालेय टेबल टेनिस स्पर्धेमध्ये यश मिळविलेले कर्नल परब्स् स्कूल–अ गुरुकुलच्या खेळाडू.

नगर – सोमैय्या विद्यामंदिर, लक्ष्मीवाडी (ता. राहाता) येथे २१ सप्टेंबर रोजी जिल्हास्तरीय शालेय टेबल टेनिस स्पर्धेत कर्नल परब्स् स्कूल – अ गुरुकुलच्या खेळाडूंनी उत्कृष्ट खेळाचे दर्शन घडवत लक्षणीय यश संपादन केले. १४ वर्षे वयोगटात रिदान सारडा, समदर्श पुरसवाणी व विहान भगत यांनी सांघिक खेळात उल्लेखनीय कामगिरी करत प्रतिस्पर्ध्यांवर मात केली. त्यांच्या अचूक, उत्कृष्ट समन्वय आणि आत्मविश्वासपूर्ण खेळामुळे कर्नल परब्स् स्कूलच्या संघाने विजयी कामगिरी करत विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी दिमाखात प्रवेश केला.

या स्पर्धेत अहिल्यानगर, कोपरगाव, संगमनेर, राहाता, प्रवरा, पारनेर आदी तालुक्यांतील खेळाडूंनी सहभाग घेतला होता.

या यशाबद्दल संस्थापिका सौ. गिता परब, संचालक दिलीप परब, रिकीराज परब आणि मुख्याध्यापिका कु. अर्पिता रणनवरे, शिक्षकवृंद व पालकांनी विजयी खेळाडूंचे अभिनंदन केले. खेळाडूंना शाळेचे क्रीडा शिक्षक सौरभ सानप यांचे मार्गदर्शन लाभले.

# राष्ट्रीय रायफल शूटिंग स्पर्धेत राजलक्ष्मी घडेकर हिने उंचावले अहिल्यानगरचे नाव



नगर – येथील भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलची इयत्ता नववीची विद्यार्थिनी राजलक्ष्मी अशोक घडेकर हिने भोपाळ (मध्य प्रदेश) येथे राष्ट्रीय रायफल असोसिएशन ऑफ इंडिया यांच्या वतीने आयोजित २८ व्या कुमार सुरेंद्र सिंग आंतरशालेय राष्ट्रीय रायफल शूटिंग स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी केली. या स्पर्धेत तिने हजारो स्पर्धकांमधून राष्ट्रीय रँक मिळवला असून, तिने ३७२ गुणांक प्राप्त केला आहे. विशेष म्हणजे राजलक्ष्मीने रायफल शूटिंगचा सराव केवळ मागील आठ महिन्यांपासून सुरू केला आहे. या अल्प कालावधीत तिने जिल्हास्तरीय स्पर्धेत मेडल मिळवले, त्यानंतर राज्यस्तरीय स्पर्धेसाठी तिची निवड झाली आणि आता राष्ट्रीय स्तरावरही उल्लेखनीय यश संपादन केले. रायफल शूटिंग हा एकाग्रता, अचूकता, संयम आणि मानसिक स्थैर्याची आवश्यकता असलेला खेळ असून, अल्पावधीत तिने या खेळातील कौशल्य आत्मसात केले आहे. गोवा येथे झालेल्या १३ व्या वेस्ट झोन रायफल शूटिंग चॅम्पियनशिपमध्ये तिने अजिंक्यपद पटकावले आहे.

राजलक्ष्मीने अहिल्यानगर सिटी रायफल ॲण्ड पिस्तोल स्पोर्टस् शूटिंग क्लब येथे प्रशिक्षण घेतले असून तिला प्रशिक्षक आलिम शेख, छबुराव काळे आदींचे मार्गदर्शन लाभले. रायफल शूटिंगमध्ये अचूक नेम साधण्यासाठी एकाग्रता अत्यंत महत्त्वाची असते. एव्हरेस्ट अबॅकस अकॅडमीमध्ये अबॅकसच्या सततच्या सरावामुळे माझी एकाग्रता वाढण्यास मदत झाली आणि त्याचा फायदा मला रायफल शूटिंगमध्ये झाला. त्यामुळे अकॅडमीच्या माझ्या सर्व शिक्षिकांची मी आभारी आहे. पुढील आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी तयारी सुरू असून, भारताचे प्रतिनिधित्व करत उत्तुंग यश मिळवण्याचा माझा संकल्प असल्याचे राजलक्ष्मी हिने म्हंटले आहे.

कु. राजलक्ष्मीच्या यशाबद्दल श्रीगोंदा तालुका कृषी सेवा संघाचे पदाधिकारी व संचालक मंडळ, एव्हरेस्ट अबॅकस अकॅडमीचे संचालक मंडळ तसेच भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलचे मुख्याध्यापक व शिक्षकवृंद यांनी तिचे अभिनंदन केले आहे.

# घुले पाटील कॉलेजमध्ये मतदार जनजागृती उपक्रम



मतदार नोंदणी आणि लोकशाहीतील सहभाग या विषयावर मार्गदर्शन करताना प्रशांत शेलार.

नगर – जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे मारुतरावजी घुले पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात ‘विद्यार्थी विकास मंडळ’ आणि ‘राज्यशास्त्र विभाग’ यांच्या संयुक्त विद्यमाने मतदार जनजागृती उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी मतदार नोंदणी आणि लोकशाहीतील सहभाग या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन करताना अहिल्यानगरचे मतदार नोंदणी अधिकारी प्रशांत शेलार बोलत होते. आपल्या विशेष मनोगतात प्रशांत शेलार म्हणाले, लोकशाही ही केवळ एक प्रणाली नसून नागरिकांचा सक्रिय सहभाग हा तिचा मुख्य आधार आहे. १८ वर्षे पूर्ण झालेल्या प्रत्येक तरुणाने आपले नाव मतदार यादीत नोंदवून घेणे हे केवळ कर्तव्य नसून अधिकारही आहे. मतदार नोंदणीची प्रक्रिया आता ऑनलाईन पद्धतीने अत्यंत सुलभ झाली आहे. त्यामुळे युवकांनी केवळ स्वतःच नोंदणी न करता आपल्या कुटुंबातील व परिसरातील पात्र घटकांनाही यासाठी प्रवृत्त करावे, असे आवाहन त्यांनी केले.

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार महाराष्ट्रासह ११ राज्यांमध्ये ‘विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम २०२६’ जाहीर करण्यात आला आहे. त्यानुसार १ ऑक्टोबर २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी वयाची १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या नवमतदारांच्या नोंदणीसाठी ही विशेष मोहीम राबवली जात आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर (निवडणूक शाखा) यांच्या वतीने १७ सप्टेंबर रोजी सर्व महाविद्यालयांना पत्र पाठवण्यात आले आहे. तसेच सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी (२२५–अहिल्यानगर शहर विधानसभा मतदारसंघ) यांनी १० सप्टेंबर २०२६ रोजीच्या पत्रान्वये कळवले आहे की, ऑक्टोबर २०२४ नंतर मतदार यादीचे पुनरीक्षण झाले नसल्याने ३१ ऑगस्ट २०२६ ते ३० सप्टेंबर २०२६ हा कालावधी दावे व हरकतींसाठी निश्चित करण्यात आला आहे. या मोहिमेअंतर्गत मारुतरावजी घुले पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील १ ऑक्टोबर २०२६ रोजी १८ वर्षे पूर्ण झालेल्या सर्व पात्र विद्यार्थ्यांची मतदार यादीत नाव नोंदणी करणे. बंधनकारक आहे. माझे मत, माझा अधिकार हा संदेश प्रत्यक्षात आणावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यार्थी विकास मंडळाचे अधिकारी प्रा.एस.एम.बांगर यांनी केले.

राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. पूनम खरड यांनी मार्गदर्शन करताना मतदानाचे मूल्य आणि लोकशाही प्रक्रियेतील नागरिकांच्या भूमिकेचे महत्त्व पटवून दिले.

कार्यक्रमास प्राणीशास्त्र (झूलॉजी) विभाग प्रमुख प्रा. पी. व्ही. पठारे, प्राध्यापिका एस.वाय.धरम यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि उपस्थितांचे आभार प्रा.एस.व्ही.मरकड यांनी मानले. या उपक्रमास महाविद्यालयातील नव्याने मतदार नोंदणी करणारे विद्यार्थी उपस्थित होते.

# जिल्हास्तरीय शालेय तायक्वांदो स्पर्धेत यश नगरकर सुवर्णपदकाचा मानकरी




जिल्हास्तरीय शालेय तायक्वांदो स्पर्धेत यश नगरकर सुवर्णपदकाचा मानकरी ठरला.

नगर – वाडिया पार्क येथे पार पडलेल्या अहिल्यानगर महानगरपालिका जिल्हास्तरीय शालेय तायक्वांदो स्पर्धेत श्री रामकृष्ण एज्युकेशन इंग्लिश मीडियम स्कूलचा खेळाडू यश गणेश नगरकर याने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत सुवर्णपदक (गोल्ड मेडल) पटकावले आहे. २७ सप्टेंबर रोजी अहिल्यानगर येथील वाडिया पार्क क्रीडा संकुलात ही स्पर्धा पार पडली. जिल्हाभरातील विविध शाळांमधून अनेक खेळाडूंनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता. यशच्या या यशामागे स्टार तायक्वांदो अॅक्डमीचे रविराज यादव, दीपक धनवटे व अजित लोळगे यांचे मार्गदर्शन लाभले.

यशाबद्दल प्राचार्य मॅडम गगन भूतानी, शिक्षकवृंद, क्रीडाप्रेमी आणि पालकांनी त्याचे विशेष अभिनंदन केले.

# पिंपळगाव माळवी येथून मोटरसायकलची चोरी

नगर – नगर तालुक्यातील पिंपळगाव माळवी येथून एकाची हिरो होंडा कंपनीची डॉन मोटरसायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे.

याबाबत शहाजी मारुती जावळे (वय ६१, रा. बोल्हेगाव फाटा, अहिल्यानगर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांची मोटरसायकल (क्र. एमएच १६ एस ०४५७) पिंपळगाव माळवी (ता. जि. अहिल्यानगर) येथील हद्दीतून अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे. या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०५ (ब) नुसार गुन्हा दाखल केला आहे.



# युवक लढला वाघाशी!



मध्य प्रदेशातील कान्हा टायगर रिझर्व्हला लागून असलेल्या करेली गावात वाघाच्या हल्ल्यातून एका ३० वर्षीय आदिवासी तरुणाने धैर्याने स्वतःचा बचाव केल्याची थरारक घटना समोर आली आहे. शेताकडे जात असताना अचानक समोर आलेल्या वाघाने तरुणावर हल्ला केला; मात्र घाबरून न जाता संतोष मेश्राम याने हातातील काठीच्या मदतीने तब्बल १५ मिनिटे वाघाचा सामना केला. अखेर ग्रामस्थ मदतीसाठी धावून आल्यानंतर वाघाने जंगलाच्या दिशेने धूम ठोकली.

करेली गावातील संतोष मेश्राम शेताकडे जात असताना जंगलाच्या दिशेने आलेल्या वाघाने अचानक त्याच्यावर झडप घातली. हल्ल्यात संतोषच्या डोक्याला, हाताला आणि पायाला दुखापत झाली; मात्र जीव वाचवण्यासाठी त्याने प्रसंगावधान राखत जवळ असलेली लाकडी काठी हातात घेतली आणि वाघाचा प्रतिकार करण्यास सुरुवात केली. वाघ वारंवार हल्ला करण्याचा प्रयत्न करत असताना संतोष काठीने त्याला रोखत राहिला. त्याचवेळी त्याने मोठ्याने आरडाओरडही सुरू केली. हा संघर्ष सुमारे १५ मिनिटे सुरू होता. संतोषचा आवाज ऐकून परिसरातील ग्रामस्थ घटनास्थळी धावून आले. लोकांची चाहूल लागताच वाघाने अखेर माघार घेत जंगलाच्या दिशेने पळ काढला.

वाघाच्या हल्ल्यात जखमी झालेला संतोष कसाबसा आपल्या घरापर्यंत पोहोचला. घटनेची माहिती मिळताच वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली आणि त्याला उपचारासाठी बैहर येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. संतोषच्या डोक्याला, हाताला आणि पायाला जखमा झाल्या आहेत. रुग्णालयात त्याच्यावर उपचार सुरू असून त्याची प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात आले आहे. वन विभागानेही त्याला तत्काळ प्राथमिक आर्थिक मदत दिली आहे. 'कान्हा टायगर रिझर्व्ह'चे 'एसडीओ' आशीष पांडे यांनी घटनेची माहिती मिळताच वन विभागाचे पथक घटनास्थळी आणि रुग्णालयात पोहोचल्याचे सांगितले.

'कान्हा टायगर रिझर्व्ह'च्या आसपासच्या गावांमध्ये जंगल आणि शेतीची सीमा अनेक ठिकाणी जवळ असल्याने ग्रामस्थांचा वन्यप्राण्यांशी सामना होण्याचा धोका कायम असतो. वाघासारख्या प्राण्यांचा अधिवास असलेल्या परिसरात शेती, सरपण किंवा अन्य कामांसाठी जाणाऱ्या नागरिकांनी अधिक सतर्क राहण्याची गरज आहे. या घटनेनंतर वन विभागाने ग्रामस्थांना जंगल किंवा जंगलालगतच्या भागात एकट्याने न जाण्याचे आवाहन केले आहे. शेतीची कामे किंवा सरपणासाठी जाताना तीन-चार जणांच्या गटाने जाण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

## कॅलिडोस्कोप





# भिकारी महिलेच्या घरात नोटांच्या तीस बॅगा?

रस्त्यावर कोणता भिकारी दिसल्यानंतर अनेकांना दया येते आणि आपण त्यांना काही पैसे देतो. अनेक भिकारी असेदेखील आहेत, जे भीक मागतात; पण त्यांच्याकडे अनेक बक्कळ पैसा असतो. आता देखील असेच एक प्रकरण समोर आले आहे. एका भिकारी महिलेच्या १० बाय १० च्या घरातून नोटांनी भरलेल्या ३० बॅगा आढळल्या आहेत. ही घटना कर्नाटक येथे घडली आहे. महिलेच्या घरात १०, २० आणि ५० रुपयांनी भरलेल्या हजारो नोटा समोर आल्या आहेत. अशात महिलेच्या घरात मिळालेले घबाड पाहिल्यानंतर लोक हैराण झाले आहेत. कर्नाटकातील मांड्या जिल्ह्यातील गुथलू परिसरातून ही घटना समोर आली आहे. भिकारी महिलेचे नाव हूर उन्निसा असे आहे. हूर तिच्या बहिणीसोबत राहत होती. दोघींचेही लग्न झालेले नव्हते, म्हणून भाड्याच्या घरात दोघीच राहत होत्या. त्यांच्या बहिणीचा गेल्या वर्षीच मृत्यू झालेला. त्यामुळे हूर एकट्याच राहत होत्या. हूर यांचादेखील आजारपणामुळे मृत्यू झाला. त्यांच्या मृत्यूनंतर स्थानिक लोकांनी घराची पाहणी केली असता, नोटांनी भरलेल्या ३० पेक्षा जास्त बॅगा सापडल्या. हूर यांचे नातेवाइक आल्यानंतर पैशांची मोजणी होणार आहे तर हे पैसे आता कोणाकडे सोपवायचे याचा निर्णय घेण्यात येणार आहे

# 'चॅटजीपीटी'चा सल्ला पडला महाग




'सोशल मीडिया' आणि वाढत्या टेक्नॉलॉजीमुळे आजकाल लोकांकडून त्याचा वापर, त्यावर अवलंबून राहणे वाढले आहे. 'चॅटजीपीटी' आल्यापासून तर अनेकजण सर्रास त्याचा वापर करत असतात; मात्र त्यावर आंधळेपणाने विश्वास ठेवून काहीही अवलंबणे जीवासाठी धोकादायक ठरू शकते. याचे एक ज्वलंत, जितेजागते उदाहरण समोर आले असून 'चॅटजीपीटी'चा सल्ला ऐकणे एका माणसाला इतके महागात पडले, की त्याची रवानगी थेट हॉस्पिटलमध्येच झाली.

खरे तर, 'चॅटजीपीटी'ने सुचवलेल्या डाएट प्लॅनचे पालन केल्यानंतर एका तरुणाला रुग्णालयात दाखल करावे लागले. डॉक्टरांचे म्हणणे आहे, की आर्टिफिशियल इंटेलिजेंस (एआय) शी संबंधित ब्रोमाइड विषबाधेची ही कदाचित पहिलीच घटना आहे. वॉशिंग्टन विद्यापीठातील डॉक्टरांनी 'नल्स ऑफ इंटरनल मेडिसिन: क्लिनिकल केसेस'मध्ये प्रकाशित केलेल्या अहवालानुसार एका माणसाने त्याच्या आहारातून मीठ (सोडियम क्लोराईड) कमी करण्यासाठी 'चॅटजीपीटी'चा सल्ला घेतला. त्यानंतर 'चॅटजीपीटी' ने त्याला क्लोराईडऐवजी सोडियम ब्रोमाइड घेण्याचा सल्ला दिल्याचा आरोप आहे. त्या माणसाने तीन महिने हा सल्ला पाळला; पण त्यादरम्यान त्याची प्रकृती बिघडू लागली. त्याला पॅरानोईया आणि मतिभ्रम यासारख्या व्याधींची गंभीर लक्षणे जाणवू लागली आणि अखेर रुग्णालयात दाखल करावे लागले.

अखेर रुग्णालयात दाखल केल्यानंतर, जेव्हा त्याला रुग्णाला विचारण्यात आले, तेव्हा त्याने सांगितले, की त्याच्या आजाराचे कारण चॅटजीपीटी आहे, तेव्हा डॉक्टरांनी स्वतः 'चॅट जीपीटी'ला तोच प्रश्न विचारला आणि 'एआय'ने पुन्हा ब्रोमाइड हा पर्याय सुचवला; परंतु ते मानवी वापरासाठी असुरक्षित आहे. हे काही त्याने स्पष्ट केले नाही. यावरून असे दिसून येते की एआय संदर्भ न समजता माहिती देऊ शकते, जे अत्यंत धोकादायक आहे, असे डॉक्टरांचे म्हणणे आहे; मात्र सुदैवाने तीन आठवड्यांच्या उपचारानंतर ती व्यक्ती पूर्णपणे बरी झाली. या घटनेनंतर, डॉक्टरांनी एक गंभीर इशारा दिला आहे. 'एआय टूल्स' वैज्ञानिक माहिती अधिक सुलभ करू शकतात; परंतु ते कोणत्याही परिस्थितीत व्यावसायिक वैद्यकीय सल्लयाची जागा घेऊ शकत नाहीत. आरोग्याशी संबंधित बाबींमध्ये नेहमीच तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा, कारण 'एआय' कधी कधी चुकीचे मार्गदर्शन देऊ शकते; जे घातक ठरू शकते, असा सल्ला डॉक्टरांनी दिला आहे.

# कुठून आलं सोनं?

सोन्यासारख्या चमचमत्या धातूचं आकर्षण नसणारी व्यक्ती विरळाच! सोन्याचे दागिने, नाणी, विटा यांना प्रचंड मागणी असते. भारतात प्रचंड पैसा ओतून सोन्याची खरेदी केली जाते. इतर देशांमध्येही सोन्याची खरेदी होते. असा हा धातू कुठून आला, याच्या निर्मितीचं रहस्य काय, असे प्रश्न काहीजणांना पडतात. सोन्याची उत्पत्ती कशी झाली, याबाबत



बरेच तर्क लढवले जातात. पण सोनं अंतराळातून पृथ्वीवर आल्याचं काही संशोधकांचं म्हणणं आहे. पृथ्वीच्या पोटात दडलेलं सोनं अंतराळातून उल्कांच्या रुपात पृथ्वीवर आल्याचं संशोधक सांगतात. अर्थात याबाबतही मतंमतांतरं आहेत. पण शास्त्रज्ञांकडे याचे ठोस पुरावे असल्याचं म्हटलं जातं. सोनं अंतराळातून उल्कापडांच्या रुपात पृथ्वीवर आलं, असं जॉन एमस्ली या शास्त्रज्ञाचं म्हणणं आहे. सोनं अंतराळातून आल्याबाबत विविध तर्क लढवले जातात. १९७० मध्ये अपोलो यान चंद्रावर उतरलं. त्यानंतर अंतराळातून पृथ्वीवर झालेल्या उल्कावर्षावामुळे सोन्याची उत्पत्ती झाल्याचा दावा केला जाऊ लागला. याबाबत बरंच संशोधन करण्यात आलं आहे. त्यामुळे पृथ्वीवरचं सोनं ही अंतराळाची देणगी असल्याची बाब नाकारता येण्यासारखी नाही.

# प्रेमाखातर फुलवली बाग!

प्रेम खरे असेल तर माणूस अशक्यही शक्य करून दाखवतो. मोठमोठे डोंगर फोडून टाकतो. अलीकडेच चीनच्या सिचुआन प्रांतातील झोऊ शाओलिन यांनी आपली पत्नी यिन जी हिच्यासाठी असेच काहीतरी करून दाखवले आहे. 'साउथ चायना मॉर्निंग पोस्ट' नुसार, २०१३ मध्ये यिन जी यांनी फक्त आपल्या पतीसमोर बालपणातील आवडत्या हॉलीहॉक फुलांचा उल्लेख केला होता. त्यानंतर झोऊ यांनी त्यांना वचन दिले, की एक दिवस ते त्यांच्यासाठी एक पूर्ण बाग तयार करतील. आपल्या पत्नीच्या बालपणातील आठवणी जपण्यासाठी झोऊ यांनी ८० हेक्टर पडीक जमीन जगातील सर्वात मोठ्या हॉलीहॉक गार्डनमध्ये रूपांतरित केली. कोणताही गार्डनिंगचा अनुभव नसताना झोऊ यांनी आपले घरही विकले आणि टुआनलोंग टाउनमध्ये जमीन खरेदी केली. त्यांनी दहा वर्षे कष्टाने काम केले. देशी आणि विदेशी बिया शोधल्या आणि ८० हेक्टरची पडीक दरी फुलांनी सजवली. आज ही जागा जगातील सर्वात मोठे हॉलीहॉक गार्डन बनली आहे. यात हॉलीहॉकच्या ७०० हून अधिक जाती, १.५ लाख लिली आणि एक लाख हिबिस्कसची रोपे आहेत.



या जोडप्याची पहिली भेट १९८५ मध्ये झाली होती, जेव्हा झोऊ एक ट्रेनी टूर गाइड होते. पाच वर्षे पत्रांद्वारे संवाद साधल्यानंतर दोघांनी शेवटी लग्न केले. तिबेट ट्रिपदरम्यान भयंकर बर्फवृष्टीत अडकले असताना झोऊ यांनी आपल्या पत्नीला पाठीवर घेऊन गुहेपर्यंत नेले होते. तिथे त्यांनी तीन दिवस काढले. यिन जी मानतात, की अशा जीवनसाथीसोबत आयुष्याचा प्रत्येक क्षण सुंदर होतो. आज लग्नाच्या ३५ वर्षांनंतरही हे जोडपे आपल्या या सुंदर बागेत पाळीव कुत्रे आणि मांजरींसोबत राहते. जोडप्याला मुले नाहीत. दोघेही प्रत्येक वाढदिवस आणि वर्धापनदिनानिमित्त एकमेकांना हाताने लिहिलेली पत्रे देतात. चीनच्या केंद्रीय दूरचित्रवाणी वर दाखवल्यानंतर हे जोडपे देशभर 'ड्रीम कपल' म्हणून प्रसिद्ध झाले आहे.

# कारवर ३४०० चुंबने?



एका युवकाने चक्क किसिंग कार तयार केली. त्याने आपल्या कारवर ३४०० चुंबने घ्यायला लावले. कारच्या पूर्ण बॉडीवर चुंबनांची चिन्हेच दिसत होती. तब्बल ३४०० चुंबने कारवर होती. कार मालक आदित्य सिकरवार यांच्या माहितीनुसार, इंस्टाग्रामवर ट्रेंड सेट करण्यासाठी फॉलोअर्स वाढवण्यासाठी त्यांनी हे करण्याचा निर्णय घेतला. त्याच्या गर्लफ्रेंडने यात त्याची साथ दिली. कारच्या बॉडीवर लिपस्टिकच्या मदतीने साडेतीन ते चार तासात ३४०० चुंबने घेतली. त्यानतर आदित्य थाटीपूर परिसरातून कार घेऊन निघाला आणि पूर्ण शहरात फिरला. यानंतर या प्रकरणाला गांभीर्याने घेत थाटीपूर पोलिसांनी कार जप्त केली. या कारच्या मालकाला ५५०० दंड लावण्यात आला. कारवाईनंतर त्याने आपली चूक मान्य केली. रिल्समुळे आपण नियमांचे उल्लंघन करत असल्याचे आपल्या लक्षात आले नसल्याचे आदित्य याने म्हटले. विदेशातील ट्रेंड या युवकाने भारतात सेट करण्याचा प्रयत्न केला; पण त्याचा थेट पोलिस ठाण्यात पोहोचावे लागले.

# सफाई कामगार येतो फॉर्च्युनरमधून!

कर्नाटकातील दक्षिण कन्नड जिल्ह्यातील बंटवाल येथील ४५ वर्षीय सेसप्पा सध्या 'सोशल मीडिया'पासून स्थानिक माध्यमांपर्यंत चर्चेचा विषय ठरले आहेत. कारण त्यांची नोकरी आहे शहरातील रस्ते आणि परिसर स्वच्छ करण्याची; मात्र कामावर येताना ते टोयोटा फॉर्चुनर चालवत येतात. या दृश्यामुळे अनेकांना आश्चर्य वाटले; पण त्यामागची जवळपास तीन दशकांची मेहनत आणि संघर्षाची कहाणी अधिक महत्त्वाची आहे.

सेसप्पा यांनी १९९६ मध्ये केवळ ५० रुपये रोजंदारीवर काम सुरू केले होते. त्यांनी बंटवाल टाउन म्युनिसिपल कौन्सिलमध्ये सफाई कर्मचारी म्हणून कामाला सुरुवात केली. त्या वेळी त्यांना दिवसाला अवघे ५० रुपये मिळत होते. आर्थिक परिस्थिती अत्यंत कठीण होती. घरखर्च भागवण्यासाठी संघर्ष करावा लागत होता; मात्र परिस्थितीसमोर हार न मानता त्यांनी काम सुरू ठेवले. पुढे ते कायमस्वरूपी कर्मचारी झाले आणि त्यांच्या उत्पन्नातही सुधारणा झाली. सेसप्पा यांची मेहनत केवळ पालिकेच्या नोकरीपुरती मर्यादित राहिली नाही. सकाळी लवकर ड्युटीवर हजर होऊन ते रस्ते आणि सरकारी कार्यालय परिसराची स्वच्छता करतात. काही काळ त्यांनी कचरा वाहतूक करणारे वाहन चालवण्याची जबाबदारीही सांभाळली. पालिकेचे काम संपल्यानंतर ते शेती, दुग्धव्यवसाय आणि इतर मजुरीची कामे करून अतिरिक्त उत्पन्न मिळवत राहिले. कुटुंबाची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी त्यांनी विविध कामे स्वीकारली.



सेसप्पा यांना लहानपणापासूनच गाड्यांची विशेष आवड होती. सुरुवातीच्या काळात कामावर जाण्यासाठी ते सायकलचा वापर करत. रस्त्यावरून जाणाऱ्या गाड्या पाहताना एक दिवस स्वतःची कार असावी, असे त्यांना वाटायचे. नोकरीत स्थैर्य आल्यानंतर त्यांनी हळूहळू हे स्वप्न पूर्ण करण्यास सुरुवात केली. आधी मारुती ८००, त्यानंतर ऑल्टो, ओम्नी, रिट्झ आणि स्कॉर्पियो अशा वेगवेगळ्या गाड्या त्यांच्या मालकीच्या झाल्या.

फॉर्चुनर घेण्याचे स्वप्न त्यांनी अनेक वर्षे मनात जपले होते. अखेर त्यांनी सेकंड-हँड टोयोटा फॉर्चुनर सुमारे १२ लाख रुपयांना खरेदी केली. यासाठी त्यांच्या आधीच्या अल्टो आणि स्कॉर्पियो गाड्या विकल्या आणि उर्वरित रक्कम स्वतःच्या बचतीतून तसेच कर्जाच्या माध्यमातून उभी केली. त्यामुळे ही कार अचानक मिळालेली संपत्ती नसून अनेक वर्षांच्या बचत, मेहनत आणि नियोजनातून पूर्ण झालेले स्वप्न आहे. सेसप्पा यांची कहाणी विशेष ठरण्याचे कारण म्हणजे महागडी कार घेतल्यानंतरही त्यांनी आपले काम किंवा वागणूक बदललेली नाही. ते पहाटे साधारण ५.३० ते ६ वाजण्याच्या दरम्यान ड्युटीवर पोहोचतात आणि बीसी रोड परिसरात स्वच्छता करतात. फॉर्चुनर एका ठिकाणी पार्क करून ते नेहमीप्रमाणे हातात झाडू घेतात. त्यांच्या दृष्टीने गाडी ही वैयक्तिक आवड आणि मेहनतीचे फळ आहे. कामाची प्रतिष्ठा मात्र वाहनाच्या किमतीवर ठरत नाही.

